# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०६ मार्च, २०२६ / फाल्गुन १५, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल मंत्री** | |
| **(२)** | **वने मंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **सामाजिक न्याय मंत्री** | |
| **(६)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(७)** | **मदत व पुनर्वसन मंत्री** | |
| **(८)** | **मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### छत्रपती संभाजीनगर शहरातील ब्रिजवाडी येथील जमिनीचा बेकायदेशीररित्या खरेदी विक्री व्यवहार केल्याबाबत

**(१) * ६६६८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील ब्रिजवाडी येथील सर्व्हे नं.३० मधील ५४ एकर ३० गुंठे एवढे क्षेत्र असलेल्या वर्ग-२ च्या या शासकीय जमिनीचे बाजार मुल्य २०० कोटी रुपये एवढे असून, सदर वर्ग-२ च्या जमिनीचा बेकायदेशीर व्यवहार करण्यासाठी मा.विभागीय आयुक्त व मा.जिल्हाधिकारी यांच्या बनावट सह्या व शिक्के यांचा वापर करुन खरेदी विक्री व्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय जमिनीच्या गैरव्यवहारामध्ये महसूल विभागातील अधिकारी व जमिनीचे बेकायदेशीररित्या व्यवहार करणाऱ्या मध्यस्थांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन सदर जमिनीचा बेकायदेशीररित्या झालेला व्यवहार रद्द करुन, सदर गैरव्यवहारातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या बनावट सह्या व शिक्के वापरून बनावट आदेश तयार करण्यात

आल्याची बाब दिनांक २७/११/२०२५ रोजी निदर्शनास आली. सिटी चौक पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर येथे FIR no. ४०७/२०२५ दिनांक २८/११/२०२५ रोजी अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा नोंद केलेला आहे व तपास सुरु आहे व तपासाअंती पुढील उचित कारवाई करण्यात येईल.

सदर जमिनीबाबत कोणताही खरेदी विक्री व्यवहार झालेला नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(२) * ७३१४ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.अरुण लाड, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.एकनाथराव खडसे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नांदेड जिल्ह्यात तसेच सांगली जिल्ह्यातील तासगांव तालुक्यात, जालना जिल्ह्यातील मंठा व परतूर तालुक्यात अतिवृष्टी व पुरामुळे शेतकऱ्यांच्या सुमारे ६ लाख हेक्टरवरील पिकांचे व शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले असून, सोलापूर जिल्ह्यात देखील झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, नुकसानग्रस्त १५ लाख ४० हजार २५० शेतकऱ्यांसाठी सुमारे १६३६ कोटी ८२ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली असूनही अपुरी ई-केवायसी प्रक्रिया, बँक खाते तपासणीतील विसंगती, आधार-खाते लिंक नसणे व प्रणालीमधील तांत्रिक व अन्य त्रुटींमुळे सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ३ लाख ४८ हजार शेतकऱ्यांसाठीची २७७ कोटी १६ लाख रुपयांची मदत अद्याप त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याचे तसेच जळगांव जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त ५० हजार ७३२ शेतकऱ्यांना ई-केवायसी अभावी अद्यापही मदत मिळालेली नसल्याचे तसेच नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यात शेतपिकांचा पंचनामा व इतर प्रक्रिया पूर्ण होऊनदेखील हजारो शेतकऱ्यांना गारपीटीमुळे झालेली नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व आपत्ती प्रतिसाद निधीसाठी माहे डिसेंबर, २०२५ च्या पुरवण्या मागण्यांमध्ये १५ हजार ६४८ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिवृष्टी नापिकी, कोरडा दुष्काळ, बोगस बियाणे, किटकनाशके, पीककर्ज, हमीभाव, सावकारी कर्ज, शासनाकडून मिळणारी तुटपुंजी मदत इत्यादीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याने राज्यात विशेषत: यवतमाळ जिल्ह्यात ३३४ दिवसांमध्ये ३४२ शेतकऱ्यांनी, नांदेड जिल्ह्यात २४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एन.आर.बी च्या अहवालानुसार देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या राज्यात होत असून सन २०२४ मध्ये महाराष्ट्रात दररोज सरासरी सात प्रमाणे वर्षभरात २७०६ आत्महत्या झाल्या आहेत तसेच सन २०२५ मध्ये गत आठ महिन्यात १ हजार १८३ आत्महत्या झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १००% नुकसान भरपाई व सकस बियाणे देण्याबाबत व त्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत तसेच जळगाव व सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या ई-केवायसी व अन्य तांत्रिक त्रुटी दूर करून शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसानभरपाईची रक्कम जमा करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच गेल्या तीन वर्षांत मराठवाड्यातील किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे व याप्रकरणांमध्ये किती आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून आर्थिक मदत देण्यात आली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

आत्महत्येप्रकरणी यवतमाळ जिल्ह्यात जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली असून चौकशीत १७ शेतकरी आत्महत्या या सावकारी कर्जामुळे केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तसेच, जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अहवाला नूसार सावकारी कर्जाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबतची तक्रार जिल्हा उपनिबंधक, नांदेड कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(४) व (५) अंशत: खरे आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येप्रकरणी महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये मदत देण्याबाबतचे निकष निश्चित केलेले आहेत. त्यानुसार शेतकरी आत्महत्या प्रकरणातील शेतकऱ्यांच्या वारसांना मदत देण्यात येते.

शेतकऱ्यांच्या ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तालुकास्तरावर कॅम्पचे विशेष आयोजन करण्यात आले आहे.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणी पात्र प्रकरणांची संख्या २५९० असून त्यापैकी २५७४ शेतकऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागांमध्ये मागासवर्गीय समाजाच्या व्यक्तींवर सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यास विरोध होत असल्याबाबत

**(३) * ७१५६ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागासवर्गीय समाजाच्या व्यक्तींच्या मृत्यूनंतरही गावातील सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार विधी करण्याचा मूलभूत हक्क नाकारला जात असून पिंपळदरी (ता.उमरखेड, जि.बुलढाणा)

गावात एका १९ वर्षीय बौध्द समाजातील मुलीवर हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कारास मनाई करण्यात आली असल्याचे व सिंदखेड (ता.गेवराई, जि.बीड) गावातही सार्वजनिक स्मशानभूमीत मातंग समाजातील व्यक्तीवर अंत्यसंस्कार करण्यास गावातील प्रस्थापितांनी विरोध केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सर्व ग्रामसेवकांना आदेश देऊन मागासवर्गीय समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी बांधण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत तसेच संबंधित जातीयवादी मानसिकतेच्या आरोपींविरोधात कोणती कारवाई केली तसेच सदरहू घटनेच्या चौकशीसंदर्भात संबंधित पोलीस तसेच तहसिलदार यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे पिंपरदरी, ता.उमरखेड, जि.यवतमाळ येथील एका १९ वर्षीय बौध्द समाजातील मुलीवर हिंदु स्मशानभुमीत अंत्यसंस्कारास नागरिकांनी मनाई केल्याची घटना दिनांक १४/०६/२०२५ रोजी घडली होती.

मौजे सिंदखेड, ता.गेवराई, जि.बीड येथील गट क्र. ७४ मध्ये २० गुंठे जागा मागासवर्गीयांच्या स्मशानभूमीसाठी शासनाकडून देण्यात आलेली आहे. तथापि, सदर जागा गावापासून २ किलोमीटर अंतरावर गावाबाहेर गायरान जमिनीवर असल्याने ती जागा लांब पडत असल्याने तसेच सदर जागा गायरान जमीनीमध्ये नेमकी कुठे आहे याबाबत माहिती नसल्याने मयताच्या अंत्यविधीचा प्रश्न निर्माण झाला होता.सदर ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यास गावातील कोणाचाही विरोध दिसुन आलेला नाही. तसेच गावात सार्वजनिक स्मशानभूमी आढळून आली नाही.

(२) पिंपरदरी, ता.उमरखेड, जि.यवतमाळ येथील घटनेबाबत पोलीस प्रशासनाकडे किंवा महसूल प्रशासनाकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही. मात्र, तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस व गावकरी यांनी दोन गटातील आपसी वाद-विवाद सामंजस्यानी मिटवला असून ग्रामपंचायत मध्ये तंटामुक्त समिती कार्यरत असल्याने यापुढे अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असे तेथील पोलीस, गावकरी तथा तंटामुक्ती अध्यक्ष यांनी सांगितले आहे.

तसेच मौजे सिंदखेड, ता.गेवराई, जि.बीड येथील घटनेच्या अनुषंगाने महसूल विभागातील तसेच पोलीस प्रशासनातील संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी गावामध्ये जाऊन गावातील प्रतिष्ठीत व्यक्तींशी चर्चा करून मागासवर्गीयांसाठी देण्यात आलेली जागा त्यांच्या ताब्यात देऊन मयताचा अंत्यविधी करण्यात आला असून तेव्हापासून गावामध्ये मागासवर्गीय समाजाचे स्मशानभूमीचा कोणताही वाद अस्तित्वात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जातीच्या सहकारी सूत गिरण्यांना अनुदान वितरीत करण्याबाबत

**(४) * ७११४ श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जातीच्या सहकारी सूत गिरण्यांना अनुदान दिले जात असून आर्थिक मदतीसाठी दीर्घ मुदतीचे कर्ज आणि भागभांडवल दिले जाते ज्यामध्ये गिरणीने उभारलेल्या सभासद भागभांडवलाच्या (किमान ५% किंवा रुपये ८० लाख) आधारावर शासनाकडून ५०% दीर्घ मुदतीचे कर्ज आणि सहकार विभागाकडून ४५% भागभांडवल हे एकत्रित अनुदान सुमारे ९५% पर्यंत असल्याने अनेक नामंकित वस्त्रोद्योग यामुळे अस्तित्वात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रस्तावित अथवा अनुदानास पात्र असलेल्या अथवा अनुदान वितरणाच्या प्रतिक्षेत असणाऱ्या अनेक सूत गिरण्यांचे प्रस्ताव हे अनेक महिन्यांपासून सामाजिक न्याय विभागाच्या स्तरावर अनुदान मंजुरी करीता हेतुपुरस्सररित्या प्रलंबित ठेवले जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उद्योगांचे अनुदान प्रलंबित ठेवणारे अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त उद्योगांना अनुदान वितरित करण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांचे विविध कृषी योजनांकरीताचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरील पूर्वसंमती प्रक्रिया बंद केल्यामुळे प्रलंबित असल्याबाबत

**(५) * ७५५८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरील ‘पूर्वसंमती’ (Pre-sanction) प्रक्रिया अलीकडील काही महिन्यांपासून लॉक करण्यात आल्यामुळे राज्यातील हजारो शेतकऱ्यांचे विविध कृषी योजनांकरीताचे अर्ज प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून फळबाग लागवड, सूक्ष्मसिंचन, कृषी यांत्रिकीकरण व इतर योजनांसाठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना पूर्वसंमती न मिळाल्यामुळे अनुदान, साहित्य खरेदी व कामे सुरू करण्यात अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाडीबीटी पोर्टलवरील पूर्वसंमती प्रक्रिया लॉक करण्याचा निर्णय नेमक्या कोणत्या कारणामुळे घेण्यात आला आहे तसेच या निर्णयाबाबत शासन निर्णय किंवा परिपत्रक निर्गमित केले आहे काय,
(४) असल्यास, महाडीबीटी पोर्टलवरील पूर्वसंमती प्रक्रिया तातडीने सुरू करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांचे सर्व प्रलंबित अर्ज कालबध्द पध्दतीने निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) खरे आहे. सन २०२५ -२६ मध्ये कृषी विभागाच्या विविध योजनांतर्गत एकूण ४९,६४,५८३ अर्ज महाडीबीटी पोर्टलद्वारे निवडण्यात आले आहेत. त्यापैकी १८,०४,३१७ अर्ज प्रक्रियेत असून ७,७५,१३५ अर्जांना पूर्वसंमती प्रदान करण्यात आलेली आहे. सदर पूर्वसंमती प्रदान केलेल्या अर्जांच्या बाबतीत देयके अपलोड करुन त्याची मोका तपासणी करण्याचे व अनुदान अदायगी करण्याची कार्यवाही चालु आहे. सद्य:स्थितीत उपलब्ध निधी प्रमाणे पूर्वसंमती प्रदान करण्यात आलेल्या असून काही योजनांमध्ये नवीन पूर्वसंमती देणे बंद आहे.
(२) सन २०२५ -२६ मध्ये कृषी विभागाच्या विविध योजनांतर्गत एकूण ४९,६४,५८३ अर्ज महाडीबीटी पोर्टलद्वारे निवडण्यात आले आहेत. त्यापैकी १८,०४,३१७ अर्ज प्रक्रियेत असून ७,७५,१३५ अर्जांना पूर्वसंमती प्रदान करण्यात आलेली आहे. सदर पूर्वसंमती प्रदान केलेल्या अर्जांच्या बाबतीत देयके अपलोड करुन त्याची मोका तपासणी करण्याचे व अनुदान अदायगी करण्याची कार्यवाही चालु आहे.
(३) आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उपलब्ध निधी विचारात घेता सद्य:स्थितीत पूर्वसंमती प्रक्रिया आयुक्त स्तरावरुन बंद करण्यात आलेली आहे. याबाबत शासन निर्णय किंवा परिपत्रक जारी करण्यात आलेले नाही.
(४) निधी उपलब्धतेनुसार पूर्वसंमती प्रदान करण्यात येणार असून, कोणताही अर्ज परस्पर रद्द होणार नाही याची काळजी घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) येथील रोजगार हमी योजनेंतर्गत लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) * ७७२५ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट (जि.अमरावती) येथील जामली आर. येथे ७ कि.मी. अंतरावरील रोजगार हमी योजनेंतर्गतच्या कामात बोगस मजुरांची नावे दाखवून व बोगस बायोमॅट्रीक मशीनचा वापर करून ३ लाख ५१ हजार ४०० रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामात लाखो रुपयांचा गैरव्यवहार होऊनही दोषींवर प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने मेळघाट (जि.अमरावती) येथील जामली आर. येथे ७ कि.मी अंतरावरील रोजगार हमी योजनेंतर्गतच्या कामात बोगस मजुरांची नावे दाखवून व बोगस बायोमॅट्रीक मशीनचा वापर करून लाखो रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही
(३) सदर प्रकरणी अपहाराची रक्कम रुपये १९६५६०/- ही वनपरिक्षेत्र अधिकारी व कनिष्ठ लिपिक, गाविलगड यांच्याकडून वसूल करण्यात येऊन ३० दिवसांच्या आत शासन खाती जमा करण्याबाबत व

संबंधितांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९७९ अन्वये वनविभाग स्तरावरुन चौकशी करुन कारवाई करण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो), अमरावती यांनी आदेश दिलेले आहेत. तसेच, दोषी असलेल्या एका कंत्राटी कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात आली आहे व जामली आर येथील संबंधित ग्रामरोजगार सेवक यांच्यावर मग्रारोहयो अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये प्रत्येकी रुपये १०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना कृषी योजनांचे अनुदान मिळणेकरीताची शेतकरी ओळखक्रमांक नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याबाबत

**(७) * ७४१० श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना 'फार्मर आयडी' हे डिजिटल ओळखपत्र प्रामुख्याने सन २०२५-२६ पासून अधिकृतपणे अनिवार्य केले असून, ज्याची सुरुवात प्रधानमंत्री किसान योजनेच्या नवीन अर्जदारांसाठी दिनांक १ जानेवारी २०२५ पासून झाली असून, सदर ओळखपत्र केंद्र शासनाच्या "ॲग्री स्टॅक" (AgriStack) अंतर्गत सर्व शेतकऱ्यांना लागू केले जात असल्याने "फार्मर आयडी" (Digital Farmer ID) प्राप्त शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांचे लाभ थेट, पारदर्शकपणे आणि वेळेवर मिळत असून या डिजिटल ओळखपत्राद्वारे पीएम किसान सन्मान निधी, पीक विमा, बियाणे/खत अनुदाने, कर्ज सुविधा (KCC) आणि नैसर्गिक आपत्तीत त्वरित नुकसान भरपाई यांसारखे महत्त्वाचे फायदे सहज मिळविता येत असल्याने राज्यातील शेतकऱ्यांना कृषी योजनांचे अनुदान मिळणेकरीता "फार्मर आयडी" असणे शेतकऱ्यांना बंधनकारक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर फार्मर आयडी नोंदणीची प्रक्रिया गुंतागुंतीची असून अनेक शेतकऱ्यांना संकेतस्थळावरील लघुसंदेश समजत नसल्यामुळे राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांना फार्मर आयडी उपलब्ध होऊ शकले नाहीत, त्यामुळे ठिंबक सिंचन व इतर कृषी योजनांच्या अनुदान तसेच पीएम किसान सन्मान निधी, पीक विमा, बियाणे/खत अनुदाने, कर्ज सुविधा (KCC) आणि नैसर्गिक आपत्तीत त्वरित नुकसान भरपाई यांसारखे महत्त्वाचे फायदे मिळण्यापासून लाखो शेतकरी वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना फार्मर आयडी उपलब्ध करुन देण्याकरीता महाडीबीटी संकेत स्थळावर लॉगीन करण्याची पध्दत बदलून त्यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी तसेच ती सोप्या रीतीने शेतकऱ्यांना अवगत होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१), (२) आणि (३) कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेण्याकरीता राज्य शासनाच्या दिनांक ११ एप्रिल, २०२५ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १५ एप्रिल, २०२५ पासून शेतकरी ओळखक्रमांक (फार्मर आयडी) अनिवार्य करण्यात आला आहे.

केंद्र शासनाने पी. एम. किसान योजनेंतर्गत नवीन अर्जदारांकरीता १ जानेवारी, २०२५ पासून शेतकरी ओळखक्रमांक अनिवार्य केला आहे.

विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना महा-डीबीटी/ नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प डीबीटी संकेतस्थळावर सर्वप्रथम शेतकरी ओळखक्रमांक नमूद करावा लागतो. त्यानंतर या प्रणालीवर शेतकऱ्यांना आवश्यक घटकाचा लाभ घेण्यासाठी अर्ज करता येतो.

शेतकरी ओळखक्रमांक काढण्याची प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि साधारणत: सात मिनिटांमध्ये पूर्ण होणारी आहे. त्यामुळे ती प्रक्रिया वेळखाऊ आणि किचकट नाही.

राज्यात १ कोटी ३१ लाखाहून अधिक शेतकऱ्यांचे शेतकरी ओळखक्रमांक काढुन देण्यात आलेले असून शेतकरी ओळखक्रमांक उपलब्ध करुन देण्यात राज्य अग्रेसर आहे.

ज्या शेतकऱ्यांना कृषी विषयक योजनांचा लाभ मिळण्याबाबत लॉटरी मध्ये निवड झाली परंतु ज्यांनी अद्याप शेतकरी ओळखक्रमांक साठी अर्ज केला नव्हता अशा शेतकऱ्यांचा डीबीटी वरील १० दिवसांच्या मुदतीच्या वेळेच्या मर्यादेमुळे पाठपुरावा सुरू होता.

ॲग्रिस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखक्रमांक तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून ज्या शेतकऱ्यांचे शेतकरी ओळखक्रमांक अद्याप तयार करण्यात आलेले नाहीत, त्यांचे शेतकरी ओळखक्रमांक तयार करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयांना वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वनोत्पादनांच्या ई-लिलाव प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८) * ६६३२ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर:** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वनविभागामार्फत दर महिन्याला लाकूड व वनउत्पादनांच्या ई-लिलाव प्रक्रिया होत असून सदर प्रक्रिया हेतुपुरस्सर 'अपयशी' ठरवून अपारदर्शक खुल्या (स्पॉट) लिलावांना प्रोत्साहन दिले जात असल्याने शासकीय महसुलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-लिलाव प्रक्रियेत उत्पादनांची 'अपसेट प्राईस' (किमान विक्री किंमत) अतार्किकरीत्या जास्त ठरवून उत्पादन विक्री न झाल्याचे दाखविले जात असून, तेच उत्पादन खुल्या लिलावात अत्यंत कमी दरात विकून टिंबर माफियांना फायदा करून दिला जात असून डेपोमध्ये १५० ते ३०० कोटी रुपयांचे लाकूड उपलब्ध असतानाही नवीन वृक्षतोड सुरू असल्याने पर्यावरणावर दुष्परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने ई-लिलाव प्रक्रियेतील गैरव्यवहार रोखण्याकरीता तसेच शासकीय महसुलाचे होणारे कोट्यवधी रुपयांचे नुकसान टाळण्याकरीता कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) अशा प्रकारचे मुद्यांच्या आधारे जनहित याचिका क्रमांक ९२/२०२५ मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल करण्यात आली आहे.

(२) व (३) वनोपजाची विक्री ई-लिलाव पध्दतीच्या माध्यमाने तसेच परिस्थितीनुरुप ई-लिलावात अविक्रीत राहिलेल्या वनोपजाची विक्री प्रयोजनार्थ शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही

करण्यात येते. तसेच वन क्षेत्रातून वनोपजाचे निष्कासन संबंधित विभागासाठी मंजूर कार्य आयोजनानुसार तसेच प्रत्येक वर्षी केंद्र शासनाकडून याबाबतीत रितसर पुर्वपरवानगी प्राप्त करुन घेण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरूड मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील पुनर्वसित गावांतील कुटुंबाना नवीन घरे बांधून देण्याबाबत

**(९) * ७५८८ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरूड मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील २८ गावांचे सन १९९१ च्या महापुरामध्ये नुकसान झाल्याने ३२ वर्षांपूर्वी त्या गावांना पूर्णतः पुनर्वसित करण्यात आले असून बराच कालावधी होऊन गेल्यामुळे सदर घरे ही मोडकळीस आली असून जीवित हानी होण्याची शक्यता असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्वसित गावांमध्ये राहणारे लोक हे मोलमजुरी करून त्यांचा उदरनिर्वाह करित असल्याने त्यांना स्वतःची घरे बांधणे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही व सदर घरांची कालमर्यादेपेक्षा पंधरा वर्षे जास्त झाल्याने त्यांना नवीन घरे बांधून देण्याची आवश्यकता असल्याने सदर गावांना न्याय मिळावा याकरीता रयत क्रांती संघटनेने शहापुर ते वरुड तहसिल कार्यालयापर्यंत मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी दखल घेऊन महापुरामुळे पुनर्वसन झालेल्या वरूड मोर्शी तालुक्यातील सर्व गावांतील प्रत्येक कुटूंबाला बांधकामांसाठी ५ लाख रूपये देऊन किंवा नवीन घरे बांधून देण्याबाबतची मागणी पूर्ण करण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) अमरावती जिल्ह्यातील वरूड मोर्शी तालुक्यातील २८ गावांचे सन १९९१ च्या महापुरामुळे नुकसान झाल्याने पुनर्वसन करण्यात आले आहे हे खरे आहे.

परंतु या पुनर्वसित गावातील घरे ही मोडकळीस आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) वरूड मोर्शी तालुक्यातील पुनर्वसित झालेल्या या २८ गावात महाराष्ट्र गृहनिर्माण व विकास प्राधिकरण, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती व कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, अमरावती यांच्यामार्फत ४,७९९ एवढी घरे बांधून देण्यात आली आहेत.

तसेच या गावांमध्ये आतापर्यंत शासनाच्या विविध योजनेतून ६,२३९ घरकुले मंजूर झालेली आहेत. त्यापैकी ६,०१५ घरकुलांना अनुदान वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे केम (ता.करमाळा जि.सोलापूर) येथील जमिनीचा बेकायदेशीररीत्या खरेदी-विक्री व्यवहार झाल्याबाबत

**(१०) * ६९२२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे केम (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील भूमापन क्रमांक ६२६ ही ५० एकर क्षेत्र जमीन नवीन शर्तीची वर्ग-२ ची असताना तत्कालीन तहसिलदार, करमाळा यांनी अर्थपूर्ण संगनमत करुन सदर मिळकतीची बेकायदेशीर व शासकीय नियमांचे उल्लंघन करुन विक्री करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमीन सन १९९९ मध्ये संबंधित उपविभागीय अधिकारी, उपविभाग कुर्डूवाडी, तालुका माढा यांच्या आदेशाने ६ ड च्या नोंदीवरुन वर्ग एक करण्यात आली असून, सदर खरेदी विक्रीच्या प्रक्रियेमध्ये फार मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन सदर जमिनीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार शासनाने तात्काळ रदद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच नियमबाहय पध्दतीने खरेदी-विक्रीचे व्यवहार करण्यास जबाबदार /दोषी असणाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

मौजे केम (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील भूमापन क्रमांक ६२६ जमीन ही मूळत: निर्वणीकरण झाल्यानंतर नविन अविभाज्य शर्तीवर वाटप केल्याचे निदर्शनास येत आहे.

(२) मौजे केम ता.करमाळा येथील जमीन गट नंबर ६२६ ही उपविभागीय अधिकारी, उपविभाग कुर्डुवाडी, विभाग माढा यांच्या दिनांक २८/०४/१९९९ आदेशान्वये ६ ड वरून वर्ग एक करण्यात आल्याचे दिसून येत आहे. त्याबाबतचे नोंदीसंदर्भात पुनर्विलोकनाची कार्यवाही चालू आहे.

(३) अपर जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडील दिनांक १६/०५/२०२४ आदेशाद्वारे उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी यांचे दिनांक २८/०४/१९९९ चा आदेश व मौजे केम ता.करमाळा येथील फेरफार नंबर १०७६१ ही नोंद पुनर्विलोकनामध्ये घेण्यास मान्यता दिलेली असून त्याअनुषंगाने कार्यवाही चालू आहे. तसेच, सदर जमिनीच्या अधिकार अभिलेखात इतर अधिकार सदरी असलेली नविन शर्तीची नोंद कशाच्या आधारे कमी करण्यात आली याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या मार्फत चौकशी करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यात १६० एकर क्षेत्रातील खारफुटी नष्ट करण्यात आल्याबाबत

**(११) * ७२५७ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यातील खारफुटी बाबत महाप्रीत, इआरएएफ आणि जिओ इन्फो सर्व्हिसेस या संस्थेने सन २००५ ते सन २०२२ या कालावधीतील तयार केलेल्या अहवालात १६० एकर

क्षेत्रावरील खारफुटी नष्ट करण्यात आल्याचे निदर्शनास आले असून खाडी किनारी खारफुटीच्या जागेत मोठ्या प्रमाणावर चाळी, अनधिकृत गोदामे, हॉटेल यांची अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खारफुटी नष्ट करुन तेथे अनधिकृत बांधकामे करण्यात आल्याने काही मिलिमीटर पाऊस पडल्यानंतर ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा, दिवा, घोडबंदर भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचून येथील नागरिकांच्या घरांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अतिक्रमण करणाऱ्यांवर आणि त्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यातील खारफुटी नष्ट होऊ नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) विभागीय आयुक्त, कोकण यांच्या बैठकीत प्राप्त निर्देशानुसार महाप्रीत संस्थेस मुंबई महानगर क्षेत्रातील कांदळवन क्षेत्रामधील डेब्रीज /भरावाच्या अनुषंगाने मोजमापासाठी तांत्रिक सहायाचे काम देण्यात आले होते. तथापि, प्रत्यक्ष स्थळनिरीक्षण न करता महाप्रीत संस्थेने सदर माहितीचे सादरीकरण केलेले होते. प्रस्तूत प्रकरणी कांदळवन कक्षाकडून ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यातील कांदळवन बाधित क्षेत्राची क्षेत्रिय स्तरावरुन सखोल चौकशी करण्यात आली. त्यानुसार विभागीय आयुक्त, कोकण यांनी संबंधित जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील कांदळवन क्षेत्रावरील भराव हटविण्याकरीता नियमोचित कार्यवाही करण्याबाबत निर्देशीत केले होते.

कांदळवन कक्षाच्या ताब्यात असलेल्या क्षेत्रात विनापरवानगी करण्यात आलेल्या बांधकामाबाबत संबधितांविरुध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ३३ (१) क व कलम २६ (१) अ, ड, ह अन्वये वन गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.

कांदळवन क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचारी व राज्य राखीव दलामार्फत गस्त घालून प्रभावीपणे करण्यात येत असते. तसेच कांदळवनाचे संरक्षणाकरीता Mangrove Surksha App सुरु करण्यात आलेले आहे.

कांदळवन क्षेत्रातील संवेदनशील ठिकाणी अतिक्रमण होऊ नये याकरीता भिंत / फेन्सींग बांधण्यात येत आहे. तसेच MRSAC २००५ IIST कडील २०१८ व MRSAC २०२२ नकाशाचे मदत घेऊन कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यात येत असते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नालासोपारा (जि.पालघर) येथील तत्कालीन सह जिल्हा निबंधक यांच्या बेकायदेशीर कामकाजाची चौकशी करण्याबाबत

**(१२)** * **७६१९ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपाराचे तत्कालीन सह जिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी नोंदणी उप महानिरीक्षक आणि मुद्रांक उपनियंत्रक यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी वा त्यासुमारास विशेष तपासणी पथक गठीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीला तत्कालीन सह जिल्हा निबंधक वर्ग १ यांच्या कालावधीत केलेल्या प्रकरणांची व नोंदणी केलेल्या दस्तांची सर्वकष चौकशी करण्याचे काम दिले असून यामध्ये माजी नगरसेवकांनी केलेल्या तक्रारी बाबतच्या प्रकरणांची सुद्धा चौकशी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सह जिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी पालघर यांच्या कार्यकाळात अभिनिर्णित केलेल्या व नोंदणी झालेल्या दस्ताची चौकशी करून महसुलाच्या वसुलीची कार्यवाही दंडाच्या रकमेसह करण्याचे आदेश महसूल विभागाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तत्कालीन सह जिल्हा निबंधक वर्ग १ यांनी केलेल्या बेकायदेशीर प्रकरणासंदर्भातील संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक १६/०७/२०२५ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे. यामध्ये माजी नगरसेवक श्री.धनंजय गावडे यांनी केलेल्या तक्रारी बाबतच्या प्रकरणांची सुध्दा चौकशी करण्यात येणार आहे.
(३) हे अंशत:खरे आहे.
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडून दंडाच्या रक्कमेसह वसूली करणेबाबत आदेश देण्यात आलेले असून त्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(४) सदर अनियमिततेच्या अनुषंगाने श्री.दिपक पाटील, तत्का.सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,पालघर यांना कारणे दाखवा नोटिस बजाविण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील ३५ हजार शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ देण्याबाबत

**(१३)** * **७२७४ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेद्वारे सर्व शेतकरी कुटुंबांना विशेषतः अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना दरवर्षी रुपये ६०००/- ची आर्थिक मदत रुपये २०००/- च्या तीन समान हप्त्यांमध्ये थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होत असून या योजनेत अर्ज करण्यासाठी आधारकार्ड, बँक खाते तपशील आणि जमीन मालकी नोंद आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्ह्यात ४ लाख १५ हजार ६९७ शेतकऱ्यांपैकी ३५ हजार ५०० शेतकऱ्यांनी ई-केवायसी, आधार लिंकिंग न केल्यामुळे प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या लाभापासून सदर शेतकऱ्यांना वंचित राहावे लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सांगली जिल्ह्यातील ३५ हजार शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ देण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत सांगली जिल्ह्यातील नोंदणी झालेले शेतकरी ५,१६,१९३ इतके आहेत. त्यापैकी ई-केवायसी प्रमाणीकरण, बँक खाती आधार संलग्न करणे, भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत करणे व ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी काढणे या बंधनकारक बाबींची पूर्तता केलेल्या एकूण ३,८२,२४५ पात्र लाभार्थ्यांना योजनेंतर्गत २१ व्या हप्त्याचा लाभ देण्यात आला आहे.

ई-केवायसी प्रमाणीकरण, बँक खाती आधार संलग्न करणे, भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत करणे व ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी काढणे या बाबींच्या पूर्ततेअभावी, तसेच काही संदेहजनक प्रकरणांची पडताळणी करावयाची असल्याने, नोंदणीकृत अर्जदार शेतकऱ्यांपैकी ३५,२०१ शेतकऱ्यांना अद्याप लाभ मिळालेला नाही. उर्वरित ९८,७४७ नोंदणीकृत अर्जदार हे मयत/अपात्र/आयकर दाता या कारणांमुळे योजनेच्या लाभासाठी अपात्र ठरले आहेत.

(३) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळण्यासाठी अनिवार्य असलेल्या बाबींची पूर्तता क्षेत्रिय पातळीवर संबंधित शेतकऱ्यांकडून करून घेण्यात येत आहे.

तसेच, संदेहजनक प्रकरणांबाबत (Suspected Case) संबंधित जिल्ह्यांच्या अंमलबजावणी यंत्रणेस पडताळणी करण्याचे निर्देश कृषी आयुक्तालयाकडून देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडूज (जि.सातारा) परिसरात बनावट खत विक्रीचा साठा आढळून आल्याबाबत

**(१४) * ७७६३ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडूज (जि.सातारा) परिसरात मोठ्या प्रमाणात मूळ नामांकित कंपन्यांच्या नावाचा वापर करून किंवा त्यांच्यासारख्या दिसणाऱ्या पिशव्यांमध्ये हलक्या दर्जाचे किंवा भेसळयुक्त घटक भरून विकण्यात आल्याने सदर बनावट खतांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक व पिकांचे नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित बनावट खत विक्रेत्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करुन त्यांचे परवाने रद्द करण्याबाबत व शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) व (२) माहे जानेवारी, २०२६ मध्ये कृषी विभागीय जिल्हास्तरीय भरारी पथक सातारा व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग सातारा यांनी संयुक्त पणे वडूज ता.खटाव, जि.सातारा येथील विठ्ठल नगर पेडगांव रोडवरील गोदामामध्ये छापा टाकला. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर IFFCO व Paradeep Phosphate IPL कंपनीच्या १८:४६:०,१०:२६:२६ व MOP या खतांच्या हुबेहुब गोण्या छापुन घेऊन त्यामध्ये बोगस रासायनिक खत भरुन विक्री करत असल्याचे आढळून आले. या कारवाई मध्ये रुपये २७.१८ लाख रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यानुसार सदर गोदाम

मालकाविरुध्द फलटण ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी पुढील कारवाई पोलीसांमार्फत सुरु आहे.

तसेच टाकळवाडे विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी, मौजे टाकळवाडे ता.फलटण जि.सातारा या कृषी सेवा केंद्रांच्या तपासणी दरम्यान अनुदानित संयुक्त रासायनिक खताची डि.ए.पी (१८:४६:०) खताची ५० किलो वजनाची ७२ पोती (३.६० मे. टन) व १०:२६:२६ या खताची ५० किलो वजनाची ४३ पोती (२.१५ मे. टन) आढळून आले. त्यांची नोंद E-pos मध्ये दिसून न आल्याने त्या जप्त करण्यात आल्या. सदर खतांचे नमूने अप्रमाणित आढळून आल्यामुळे संबंधित टाकळवाडे वि.का.स.से. सोसायटीचे कर्मचारी व त्यांना खत पुरवठा करणारी कंपनी व गोदामाचे मालक यांचे विरुध्द खत नियंत्रण आदेश १९८५ चे कलम १२,१३,१९, २१(अ), २२(ब), ३५ व अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३(२)(अ), ७ (२)(अ)(२) व भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४), ३(५) नुसार गुन्हाची नोंद दिनांक ०८/०१/२०२६ रोजी फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा जात पडताळणी समितीच्या कार्यपध्दतीमधील त्रुटी दूर करण्याबाबत

**(१५) * ८००४ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा जात पडताळणी समितीच्या त्रुटीपूर्ण कार्यपध्दतीमुळे गरीब विद्यार्थ्यांचे आर्थिक आणि मानसिक शोषण होत असल्यामुळे जात पडताळणी समिती विरोधात लाल सेनेच्या वतीने दिनांक १ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान “बोंबाबोंब” आंदोलन करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा जात पडताळणी समितीच्या कार्यपध्दतीची छाननी करावी, त्रुटीत काढलेल्या आणि निकाली काढलेल्या प्रस्तावांची तुलनात्मक पडताळणी करावी, प्रस्तावासोबत जोडलेल्या कागदपत्रांची सूची सादर करावी तसेच जात पडताळणी समितीव्दारे होणाऱ्या अडचणींची राज्यस्तरीय चौकशी करण्याची मागणी मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे लाल सेनेच्या वतीने लेखी निवेदनाव्दारे करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने परभणी जिल्हा जात पडताळणी समितीच्या कार्यपध्दतीमधील त्रुटी दूर करुन गरीब विद्यार्थ्यांचे होणारे आर्थिक आणि मानसिक शोषण दूर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) राज्यात “महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००” व सदर अधिनियमांतर्गत अधिसूचित “नियम २०१२” मध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

परभणी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून सन २०२५ मध्ये एकूण ७९४८ विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र वितरीत करण्यात आलेली आहेत. एकाही विद्यार्थ्याचे प्रकरण अवैध ठरविण्यात आलेले नाही. राज्यभरातील सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून विहित वेळेत प्राप्त अर्जावर निर्णय घेण्याबाबत तसेच अर्जदारांची गैरसोय होऊ नये याकरीता सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून साप्ताहिक अहवाल व वेळोवेळी आढावा बैठका महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून घेण्यात येतात. सदर बैठकांमध्ये सर्व समित्यांकडून विहित वेळेत प्राप्त प्रकरणांवर निर्णय घेण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील अवैधरित्या वृक्षतोड रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणेबाबत

**(१६) * ८१०० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी तालुक्यात (जि.नाशिक) पाडळी फाटा परिसरातील वनपरिक्षेत्रात अवैधरित्या वृक्षतोड करणारा ट्रक पकडण्यात आला असून, सदर ट्रकमध्ये सुमारे ८ टन सागवान लाकूड अवैधरित्या वाहतूक करण्यात येत असल्याचे तसेच इगतपुरी तालुक्यातील वनपरिक्षेत्रात यापूर्वीही अशा प्रकारच्या अवैधरित्या वृक्षतोड करून लाकूड तस्करीच्या घटना घडल्या असतानाही वनरक्षक व पोलीस यंत्रणा वेळेवर घटनास्थळी पोहोचत नसल्यामुळे तस्करांना पलायन करण्यास संधी मिळत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात चालकास ताब्यात घेण्यात आले असले तरी अवैध लाकूड तस्करीमागील सूत्रधार, मध्यस्थ व वाहतूक साखळी यांच्यावर कठोर कारवाई न झाल्यामुळे वनसंपदेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून शासकीय नियमांचे उल्लंघन होत आहे व तालुक्यातील वनपरिक्षेत्रात नियमित गस्त, रात्रीची तपासणी, सीसीटीव्ही अथवा तांत्रिक देखरेख यंत्रणा प्रभावीपणे राबविली जात नसल्यामुळे अशा अवैध तस्करीच्या घटनांना पुन्हा-पुन्हा चालना मिळत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अवैध लाकूड तस्करीच्या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने पुढे कोणती उपाययोजना करण्यात येत आहे, तसेच नाशिक जिल्ह्यातील वनपरिक्षेत्रात अवैध लाकूड तस्करी कायमस्वरूपी रोखण्यासाठी शासन अधिक प्रभावी नियंत्रण ठेवण्याबाबत तसेच मनुष्यळामध्ये वाढ करून व कडक कारवाईसंबंधी नियमात सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) म.रा.नागपूर यांनी कळविल्यानुसार दिनांक ६/०१/२०२६ रोजी इगतपुरी वनपरिक्षेत्रामध्ये नियमित गस्तीदरम्यान पाडळी फाटा, इगतपुरी येथे टाटा ट्रक ७०९ वाहन क्र.MH०४ FP-३३७१ लाकुड वाहतूक करीत असल्याचे निदर्शनास आले. तपासणी अंती सदर वाहतूक विनापरवाना होत असल्याचे दिसुन आल्यामुळे प्राथमिक वनगुन्हा नोंदवून भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. सदर वाहनामध्ये निम, बोर, वाभुळ अशा बिगर अनुसुचित प्रजातीचे १५.७१७६ घनमीटर लाकूड आढळून आले आहे. मात्र त्यामध्ये

साग प्रजातीचा समावेश नाही. सदर प्रकरणाची पुढील तपासणी केली असता जप्त केलेला माल वनक्षेत्रातील नसून मालकी क्षेत्रातून वाहतूक करण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानुसार याप्रकरणी विना परवाना वाहतूक होत असल्याने भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४२ व ६८ अन्वये एकूण रक्कम २००००/- इतका दंड वसुल करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत. इगतपुरी तालुक्यामधील वनक्षेत्रात अवैध वृक्षतोड तसेच अवैध वाहतूक रोखण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय कर्मचारी यांचेकडून नियमित गस्त करणे तसेच विभागीय दक्षता अधिकारी, नाशिक व फिरते पथक नाशिक यांच्यामार्फत आकस्मिक भेटी देऊन संनियत्रण करण्यात येते.

या प्रकरणामध्ये वाहनाचे मालक तसेच चालक यांची चौकशी करून जबाब व पंचनामा नोंदविण्यात आला असून भारतीय वन व अधिनियम, १९२७ अंतर्गत दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. तथापि, जप्त मुद्देमाल हा वनक्षेत्रातील नसुन श्री.ज्ञानेश्वर तुकाराम धोंगडे मौजे पाडळी, यांचे मालकीचे गट क्र. ४२८ मधील असल्याचे विचारात घेता भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या तरतुदीनुसार विना परवाना वाहतुकीच्या गुन्ह्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशीअंती भारतीय वन अधिनियम, १९२७ चे तरतुदीनुसार विना परवाना वाहतूक केल्यामुळे दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. तथापि, अवैध वाहतूक व अवैध वृक्षतोड होऊ नये या दृष्टीने या वन विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१) विभागातील सर्व क्षेत्रिय कर्मचारी यांना वार्षिक नियत क्षेत्र तपासणी कार्यक्रम नेमुन देण्यात आला आहे. तसेच संबंधित कर्मचारी यांचेमार्फत संवेदनशील क्षेत्रामध्ये नियमित गस्त देखील करण्यात येते. आवश्यकतेनुसार शस्त्र उपलब्ध करून देण्यात आले आहे.

२) वृत्त स्तरावर विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांचेमार्फत आकस्मिक पाहणी दौरे केले जातात. तसेच विभाग स्तरावर २ फिरते पथक कार्यरत आहेत.

३) विभागातील संवेदनशील ठिकाणी तपासणी नाके करण्यात आले असून त्यांचेमार्फत अवैध वाहतुकीवर निर्बंध करण्यात येतो.

४) या व्यतिरिक्त विभागाची सिमा गुजरात राज्याला लागून असल्यामुळे तेथील वन विभागाच्या कर्मचाऱ्यांची समन्वय साधण्यासाठी बैठक आयोजित करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सातारा (जि.छत्रपती संभाजीनगर) येथे अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन करण्यात येत असल्याबाबत

**(१७) * ७९०९ श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मौजे सातारा येथील गट क्र. २४७ मधील डोंगर अवैधरित्या पोखरुन मुरुम, माती व दगड इत्यादीची चोरी होत असल्याचे तसेच सदर प्रकरणी महसूल मंडळ अधिकारी यांनी पंचनामा केला असून हा डोंगर ५ ते ६ मजली इमारतीपेक्षाही उंच असून तो पूर्णत: पोखरुन, उत्खनन करुन तेथील अंदाजे १५ हजार ब्रास एवढी मुरुम व मातीची अवैधरित्या विक्री केली जात असल्याचे दिनांक ४ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासकीय परवानगी घेण्याबाबत संबंधितांनी कोणतीही दखल न घेता अवैधरित्या गौण खनिज चोरी केल्याप्रकरणी उत्खनन करणाऱ्या संबंधितांवर तसेच अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) मौजे सातारा, ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील ग.नं. २४७ मध्ये अंदाजे १५,४५० ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याचा अहवाल मंडल अधिकारी, उस्मानपूरा यांनी अपर तहसिलदार, छत्रपती संभाजीनगर यांना दिनांक ०५/१२/२०२५ रोजी सादर केला. अपर तहसिलदार, छत्रपती संभाजीनगर यांनी मंडल अधिकारी, उस्मानपूरा यांचा अहवाल व सदर गटातून जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १२/०२/२०२१ रोजी २१०० ब्रास उत्खननास देण्यात आलेली परवानगी विचारात घेवून १३,३५० ब्रास अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीपोटी दिनांक २४/०१/२०२६ रोजी रुपये ०८,८९,११,००० एवढ्या रकमेचे दंडात्मक आदेश संबंधित शेतमालक यांच्या विरूध्द पारित केले आहेत. सदर दंडात्मक रकमेचा बोजा ग. न. २४७ च्या गा.नं. नं. ७/१२ वर दाखल करण्यात आलेला आहे. तसेच संबंधितांविरूध्द पोलीस स्टेशन, सातारा येथे दिनांक १७/१२/२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस), २०२३ च्या कलम ३०३(२) आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४८(७) व ४८(८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

अवैधरित्या उत्खनन व वाहतूक याबाबत कोणताही अहवाल, पंचनामा तसेच कोणतीही ठोस प्रतिबंधत्माक कारवाई न केल्याने तसेच या प्रकरणाबाबत माहिती सादर न केल्यामुळे संबंधित मंडळ अधिकारी, उस्मानपुरा व ग्राम महसूल अधिकारी, सातारा भाग-३ यांच्याविरुध्द अपर तहसिलदार,छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत दिनांक २४/०१/२०२६ रोजी विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) येथील तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांच्या बदल्या नियमानुसार न केल्याबाबत

**(१८)** * **७७५५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) येथील तत्कालीन उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) यांनी बदली कायद्यातील तरतूदी आणि पालघर जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्ट आदेश डावलून अनेक कर्मचाऱ्यांच्या नियमांच्या विरुध्द बदल्या केल्याच्या तक्रारी पुराव्यासह शासनास प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले असून तत्कालीन उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) यांनी सेवा-शर्ती व सेवा ज्येष्ठतेचे नियम डावलून उपविभागीय महसूल सहाय्यक यांची वसई तहसिलदार कार्यालयातून उपविभागीय कार्यालयात नियमांच्या विरुध्द बदली केल्याने बाधित झालेल्या कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य खचले असून त्यांच्या सेवा-शर्ती वर नकारात्मक परिणाम झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी महसूल विभागाच्या सचिवांना चौकशी करण्याचे आदेश देऊनही अद्याप दोषी अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याने

वरिष्ठ कार्यालयाच्या अधिकाऱ्यांचा अवमान करणाऱ्या आणि बदली प्रक्रियेत आर्थिक व्यवहार व राजकीय दबावाचा वापर करणाऱ्या उपविभागीय अधिकारी यांना तात्काळ शासकीय सेवेतून बडतर्फ करुन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करुन त्यांनी नियमांच्या विरुध्द केलेल्या बदल्या रद्द करणेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) होय. स्थानिक नागरिकांमार्फत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

(३) प्रश्नाधीन कर्मचाऱ्याची सेवा मूळ पदावर वर्ग करण्यात आली असल्याने पुढील कार्यवाही आवश्यक नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हर्णे बंदर आणि परिसरात (ता.दापोली,जि.रत्नागिरी) परराज्यांतील मच्छीमार मासेमारी करित असल्याबाबत

**(१९) * ७२६४ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हर्णे बंदर आणि परिसरात (ता.दापोली) कर्नाटक आणि केरळ या राज्यांतील मच्छीमार जादा पॉवरच्या आधुनिक मशीन वापरून तसेच वेगवान नौका रात्रीच्या वेळी किनाऱ्यावर येऊन मासेमारी करित असल्यामुळे स्थानिक मच्छीमारांचे तसेच सागरी पर्यावरणाचे प्रचंड नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक मत्स्य विभागाचे अधिकारी सदरहू बाब गांभीर्याने घेत नसल्यामुळे परराज्यातील मच्छिमारांच्या वेगवान नौकांना त्याचा फायदा होत असून याबाबत शासनाकडून कडक निर्बंध घालण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्थानिक मच्छीमारांचे तसेच सागरी पर्यावरणाचे होणारे प्रचंड नुकसान टाळण्याकरीता तसेच परराज्यातील मच्छिमारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.नितेश राणे :** (१)हे अंशत: खरे आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या जलधी क्षेत्रात परराज्यातील वेगवान ट्रॉलिंग मासेमारी नौका घुसखोरी करुन मासेमारी करित असल्याच्या घटना निदर्शनास येतात. या नौकांवर महाराष्ट्र मासेमारी नियमन अधिनियम १९८१ नुसार सदर घुसखोरी करुन मासेमारी करणाऱ्या नौकांवर कारवाई करण्यात येते. तथापि, माहे डिसेंबर, २०२५ वा त्यासुमारास कालावधीमध्ये नमुद विषयाबाबत

स्थानिक मच्छिमार, संघटना, संघ अथवा मत्स्य सह. संस्था यांचेमार्फत अशी कोणतीही लेखी तक्रार वजा निवेदन आढळुन आलेले नाही.

(२) हे खरे नाही. विभागास उपलब्ध असलेल्या गस्ती नौकांद्वारे रत्नागिरी जिल्ह्याच्या जलधी क्षेत्रात प्रभावीपणे गस्त घालुन रत्नागिरी जिल्ह्याच्या जलधी क्षेत्रात घुसखोरी करुन मासेमारी करणाऱ्या परराज्यातील वेगवान ट्रॉलिंग मासेमारी नौकांचा पाठलाग करुन अशा अनधिकृत नौकांवर सागरी कायद्यातील तरतुदीन्वये कठोर कारवाई करण्यात येते. परप्रांतीय नौका राज्याच्या जलधी क्षेत्रात घुसखोरी करुन मासेमारी करतांना निदर्शनास आल्यास अशा नौकांना जास्तीस जास्त शास्ती लादण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. यामध्ये पहिल्या गुन्ह्यासाठी दोन लाख रुपये दंड आणि अशा व्यक्तीने पकडलेल्या मासळीच्या किंमतीच्या पाच पट दंड व दुसऱ्या आणि त्यानंतरच्या गुन्ह्यासाठी सहा लाख रुपये दंड आणि अशा व्यक्तीने पकडलेल्या मासळीच्या किंमतीच्या पाच पट दंड इतकी शास्ती लादण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

(३) रत्नागिरी जिल्हा कार्यालयामार्फत सन २०२१-२२ ते माहे जानेवारी २०२६ पर्यंत एकूण ११ परराज्यातील मासेमारी नौकांवर सागरी कायद्यातील तरतुदीन्वये कारवाई करुन एकूण रुपये ६६.५१ लक्ष इतका दंड वसुल करण्यात आलेला आहे. माहे जानेवारी २०२६ मध्ये गोवा राज्यातील १ अनधिकृत नौका रत्नागिरी जिल्ह्याच्या जलधी क्षेत्रात घुसखोरी केलेली असल्यामुळे या अनधिकृत परराज्यातील मासेमारी नौकेवर सागरी कायद्यातील तरतुदीन्वये शास्ती लादुन रुपये ३.२७ लक्ष इतकी दंडाची रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वसतिगृहे आणि निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य खरेदीला मंजुरी मिळण्याबाबत

**(२०) * ७९२१ श्री.विक्रम काळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वसतिगृहे आणि शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना थंडीच्या दिवसात आवश्यक असणाऱ्या चादर, बेडशीट, ब्लँकेटच्या खरेदीसाठी मंजुरी दयावी, असा प्रस्ताव पुणे येथील समाजकल्याण आयुक्तांनी दिनांक २८ ऑगस्ट,२०२५ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने त्यानुसार दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान ११ कोटी ८९ लाख ६८ हजार ८२६ रुपयांच्या साहित्य खरेदीला प्रशासकीय मान्यता दिली असून आयुक्तांनी ई-निविदा किंवा जेम पोर्टलवरुन खरेदीची प्रशासकीय कार्यवाही विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन पूर्ण करावी असे आदेश देउनही संबंधित यंत्रणेकडून त्याबाबत गत दीड महिन्यात कोणतीही कार्यवाही केली नाही व आता शासनाने दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ ची प्रशासकीय मान्यता रद्द केल्याचे दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सर्वत्र थंडीची असलेली लाट लक्षात घेता विद्यार्थ्यांसाठी ब्लँकेट खरेदी करणे आवश्यक असताना शासनाने त्याबाबत काढलेले आदेश रद्द करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शासकीय वसतिगृहे आणि शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या चादर, बेडशीट, ब्लँकेट इत्यादी साहित्य खरेदीला प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय, दिनांक १/१२/२०१६ अन्वये विहित केलेल्या तरतुदीनुसार विभागांतर्गत शासकीय वसतिगृहे आणि शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा अंतर्गत चादर, बेडशीट, ब्लँकेट या वस्तुची खरेदी राखीव ठेवण्यात आलेल्या महामंडळाकडुन करण्याकरीता सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक ११/१२/२०२५ अन्वये विभागांतर्गत शासकीय वसतिगृहे आणि शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना चादर, बेडशीट, ब्लँकेट या वस्तुची खरेदी करण्यास सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.त्यानुसार विद्यार्थ्यांना आवश्यक बेडींग साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी आयुक्तालय, समाजकल्याण, पुणे यांच्याद्वारे दिनांक ०१/०१/२०२६ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.